# (७) कांकड आरती

भक्तिचिया पोटीं बोध कांकडा ज्योती ।
पंचप्राण जीवेंभावे ओवाळूं आरती ।। १ ।।

ओवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा ।
दोन्ही कर जोडोनी चरणीं ठेविला माथा ।।ध्रु.।।

काय महिमा वर्णूं आतां सांगणे किती ।
कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ।। २ ।।

राई रखुमाबाई उभ्या दोघी दो बाहीं ।
मयुरपिच्छ चामरें ढाळिति ठायीं ठायी ।। ३ ।।

तुका म्हणे दीप घेउनि उन्मनीत शोभा ।
विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ।। ४ ।। ओवाळूं० ।।